# आम्ही अनुभवलेले नारळीकर सर व मॅडम

१९९५ च्या ऑगस्ट महिन्यात आयुका संस्थेमध्ये रुजू झालो. पहिल्या दिवशी कामावर रुजू झाल्यावर आयुकाच्या पर्सोनेल विभागाच्या प्रमुखांनी प्रथेप्रमाणे माझी सर्व स्टाफ व अधिकाऱ्यांशी ओळख करून दिली. सर्वात शेवटी त्यांनी मला संचालकांच्या ऑफिसमध्ये नेले. तेथे दारावर नाव लिहिले होते 'जयंत नारळीकर' आणि या नावाशी माझा संबंध सुरु झाला.

आयुकामध्ये 'शिपाई' ही प्रथाच नाही. प्रत्येकजण, तो शास्त्रज्ञ असो किंवा अधिकारी, स्वतःची कामे स्वतःच करायची हा पायंडा नारळीकर सरांनी या संस्थेमध्ये घालून दिला आहे. ऑफिसचे कामच नव्हे तर स्वतःसाठी टी ब्रेक किंवा लंच ब्रेक मध्ये चहा, कॉफी किंवा लंच, डिनर हे सर्वजण स्वतःच्या हाताने पॅंट्री किंवा कँटीनमध्ये जाऊन घेतात. आयुकात रुजू झाल्यावर काही महिन्यांनी सकाळी पॅण्ट्री जवळून चाललो होतो. तेव्हा मागून आवाज आला 'सामक'. मी नारळीकर सरांचा आवाज ओळखला व त्यांना अभिवादन केले. ते म्हणाले 'तुम्ही उद्यापासून माझ्या ऑफिसमध्ये माझे सहाय्यक म्हणून काम करणार आहात' हे ऐकून थक्कच झालो व त्यातून सावरतच मी सरांना धन्यवाद दिले. जरी सर अगदी साधे आहेत तरी त्यांच्या शिस्तीमुळे आणि आदरामुळे सगळ्या ऑफिसमध्ये त्यांचा दबदबा आहे. त्यामुळे जरी सरांबरोबर काम करायला मिळणार हा आनंद होता, तरी भीतीपण होतीच. सर नेहमी स्वतः ऑफिसच्या वेळेच्या आधी आयुकात हजर असतात आणि अजूनही निवृत्त झाल्यावर सुद्धा त्यांनी हा प्रघात तसाच चालू ठेवला आहे. २००३ मध्ये आयुकाचे संस्थापक संचालक पदावरून निवृत्त झाल्यावर विश्वविद्यालय अनुदान आयोगाने त्यांना आजन्म माननीय निवृत्त प्राध्यापक हे पद देऊ केले. पण त्यांचा कामाचा आवाका संचालक पदावरून निवृत्त झाल्यावर कमी न होता वाढला. प्रशासकीय जबाबदारी फक्त कमी झाली. अनेक प्रसंग आहेत, त्यांच्या शिस्तीबद्दल, त्यांच्या वेळेच्या नियोजनाबद्दल, त्यांच्या साध्या राहणीबद्दल, त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल, कारण मी जवळजवळ त्यांचा सहाय्यक म्हणून गेले २१ वर्षे कार्यरत आहे. त्यांच्या संशोधनाविषयी बोलण्याची माझी पात्रता नाही. त्यांनी माझ्यासारख्याला इतके वर्षे सांभाळून घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. माझ्या बाबतीत घडलेले एक दोन वैयक्तिक प्रसंग येथे नमूद करतो.

१५ मे १९९७ रोजी माझे लग्न ठरले होते. माझे आई बाबा सरांना प्रत्यक्ष भेटून आमंत्रण देणार होते. त्याप्रमाणे सरांनी दिलेल्या वेळेनुसार ते आयुकामध्ये आले. मी सरांना आई बाबा आल्याचे त्यांच्या ऑफिसमध्ये जावून सांगितले. ते लगेचच स्वतःहुन आई बाबांना त्यांच्या ऑफिसमध्ये घेवून गेले. मी साहजिकच ते आमंत्रण देत असताना माझ्या केबिनमध्ये होतो. अशा मोठ्या व्यक्तिला प्रत्यक्ष भेटायचे व त्यातून आपल्या मुलाचा 'बॉस', याचे साहजिकच आई बाबांना टेन्शन होते. आमंत्रण देवून आल्यावर आई बाबांच्या चेहेऱ्यावर एका महान शास्त्रज्ञाला प्रत्यक्ष भेटल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. त्यांना मी आयुकाच्या प्रवेशद्वाराजवळ सोडायला गेलो तेव्हा आईच्या लक्षात आले की आमंत्रण पत्रिकेवरती जरी सरांचे व मंगला मॅडमचे नाव होते, तरी आदरयुक्त भीतीमुळे घाईगडबडीत मॅडमचे नाव घ्यायला ते विसरले होते. आता काय करायचे हा विचार आमच्या मनात आला. परत जाऊन सरांचा वेळ घालवण्यापेक्षा मी सरांना विनंती करतो असे चिंताग्रस्त झालेल्या आई बाबांना सांगून मी ऑफिसला परतलो. पण आता सरांशी कसे बोलावे ही भीती मनात होतीच. पण धारिष्ट करून मी सरांना घडलेली हकीकत सांगितली व मॅडमलाही आमंत्रण दिले. या मोठ्या मनाच्या व्यक्तिने 'अरे ती माझी अर्धांगिनी आहे, मला आमंत्रण दिले म्हणजे तिला दिल्यासारखेच आहे, आम्हीं दोघे येणारच' असे आश्वासन दिले.

नारळीकर सर १३ ते १५ मे या दरम्यान एका मिटिंगसाठी हैदराबाद येथे गेले होते व १५ तारखेला सकाळी ९.१५ पर्यंत परत येणार होते. परंतू रेल्वेच्या नेहमीच्या नियमानुसार गाडीला पुण्याला येण्यास उशीर झाला. सर व मॅडम का आले नसतील असा विचार माझ्या मनात घोळत होता. कारण रेल्वेला उशीर झाला याची मला कल्पना नव्हती. आमची खासी पंगत बसतच होती, तेवढ्यात माझ्या मित्राने सर व मॅडम आल्याची बातमी पळतच येऊन सांगितली. आमच्या आनंदाला पारावार उरला नाही. सर व मॅडम आमच्या बरोबर जेवायला बसले. ते क्षण मी, माझी पत्नी, शेफाली व माझे आईवडिल कधीच विसरू शकणार नाहीं. सरांचे व मॅडमचे निघतांना आम्ही सर्वांनी आभार मानले. तेव्हा सर चेष्टेने म्हणाले की, आभार मानायचे असतील तर ते रेल्वेचे पण मान, कारण अजून रेल्वेने उशीर केला असता तर तुझ्या लग्न समारंभाला हजर राहू शकलो नसतो.

लग्न झाल्यानंतर एका रविवारी शेफालीने आयुका बघण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे मी तिला आयुकामध्ये घेवून गेलो. आयुकामधील माझे जवळचे सहकारी, श्री. सेनीथ सम्युअल व श्री. सदानंद तर्फे यांना भेटल्यानंतर मी शेफालीला माझे ऑफीस दाखवत असताना सर तेथे आले. त्यांच्या हातात एक फोल्डर होते. तो त्यांनी माझ्या टेबलावर ठेवला व म्हणाले ऑफिस दाखवतो आहेस का? ठीक आहे, उद्या भेटू असे म्हणून ते निघून गेले. ते बाहेर



गेल्यानंतर मी फोल्डर उघडून पाहिले. त्यामध्ये माझ्यासाठी URGENT असे नमुद केलेला ऑफिसच्या कामाचा एक मेसेज होता. आता आलाच आहेस तर हे काम करून जा, असे न सांगता ते हातातील फोल्डर माझ्या टेबलावर ठेवून गेले होते. याचे आम्हाला खूप आश्चर्य वाटले.

एकदा रत्ना मेमोरियल हॉस्पीटलमध्ये त्यांचे एक छोटेसे ऑपरेशन होते. साहजिकच मी व शेफाली त्यांना बघायला हॉस्पीटलमध्ये गेलो होतो. तेव्हा ते टी.व्ही. वर क्रिकेट मॅच बघण्यात गुंग होते. विज्ञान आणि गणित हे विषय जसे त्यांचा छंद आहेत, तसेच क्रिकेट हा सुद्धा त्यांचा आवडता विषय आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आम्ही जाताना मोसंबीचा ज्यूस घेऊन गेलो होतो. शेफालीने सरांना ज्यूस देऊ का अशी विचारणा केली. खरे सांगायचे तर ते आम्ही नेलेला ज्यूस पितील की नाहीं याची शेफालीला जरा शंकाच होती व तिने ती हॉस्पीटलमध्ये पोहचण्यापूर्वी बोलूनही दाखवली होती. पण सरांनी लगेचच तिला सांगितले की समोरच्या ग्लॉसमध्ये घालून थोडासा ज्यूस द्या आणि उरलेला फ्रीजमध्ये ठेवा, मी नंतर घेईन. तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील आनंद व आश्चर्याचे भाव अजूनही मला आठवतात.

माझ्या आयुष्यातील एक सुखद धक्का म्हणावा लागेल जेव्हा आम्हाला (मी, शेफाली आणि आमची मुलगी प्रिया) मंगला मॅडमनी घरी यायचे आमंत्रण दिले. त्याचा पूर्वार्ध असा. एकदा मी आणि सर त्यांच्या हैदराबाद भेटी संदर्भात ऑफिसमध्ये बोलत होतो. मॅडमही त्यावेळी आयुकामध्ये आल्या होत्या. आमचे बोलणे झाल्यावर मॅडम म्हणाल्या की बरेच दिवस मला तुम्हांला घरी बोलवायचे होते, तर तुम्हांला शेफालीला आणि प्रियाला घेऊन एखाद्या शनिवार, रविवारी घरी यायला जमेल का? त्यांचा या प्रश्नाने खरंतर मी एकदम अवाक झालो. तुमच्या सोयीनुसार कधीही सांगा आम्हाला यायला आनंदच होईल असे मी मॅडमला म्हटले. (एक विलक्षण योगायोग असा की जेव्हा माझे लग्न झाले तेव्हा सर हैदराबाद भेटीसाठीच गेले होते. आणि जेव्हा मॅडमनी आम्हाला आमंत्रण दिले तेव्हा मी सरांशी त्यांच्या पुढील हैदराबाद भेटी संदर्भातच बोलत होतो!) घरी जाऊन मॅडमनी अशी विचारणा केली असे सांगितल्यावर माझे आईवडील, शेफाली व प्रिया यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघण्यासारखा होता. मॅडमनी आम्हाला आमंत्रण दिले हेच आमच्या करता फार मोठी गोष्ट होती. त्या लक्षात ठेवून आम्हांला प्रत्यक्षात बोलवतील हे सगळे स्वप्नवतच वाटत होते. परंतु काही स्वप्ने खरीही होतात! चार-पाच दिवसांनी मॅडमनी फोन करून विचारले की शनिवार, ८ डिसेंबर दुपारी ४.३० - ५.०० च्या दरम्यान ठीक असल्यास सांगा. मॅडमला मी विचारले की शेफालीने संध्याकाळी त्यांना या संदर्भात फोन केला तर चालेल का? शेफालीने संध्याकाळी मॅडमला फोन केला. सरांना बटाटेवडे आवडतात, तर ते मी घरी बनवले आणि घेवून आले तर चालेल का अशी विचारणा केली. मॅडमनी त्या करता संमती तर दर्शवलीच आणि प्रियाला कुठला केक आवडतो याची विचारणा केली. त्या स्वतः तो केक बनवणार होत्या. आणि एक सरप्राईझ डीश बनवणार आहे असेही त्यांनी सांगितले. आणि तो दिवस उगवला. आम्हीं घरातून ४.१५ वाजता बाहेर पडायचे ठरवले. कारण सरांकडे जायला ३०-३५ मिनिटे लागतील असा अंदाज होता. फार आधी बाहेर पडता येणार नव्हते कारण शेफालीने केलेले बटाटेवडे गार होण्याची शक्यता होती. म्हणून आम्हीं बरोबर ४.१५ ला घराबाहेर पडलो. सारे ठरल्याप्रमाणे चालेले होते. पण अचानक गणेशखिंड रोडला आल्यावर खूप गर्दी जाणवली आणि आम्हीं त्या गर्दीत अडकलो. सरांच्या आणि मॅडमच्या वेळ पाळण्याच्या कटाक्षाची जाणीव असल्याने मी शेफालीला मॅडमला फोन करण्यास सांगितले. मॅडमनेही गर्दीत अडकल्यावर तुम्ही तरी काय करणार असे म्हणून जणू आम्हाला धीरच दिला. पुढे एक गाडी बंद पडल्यामुळे हा गोंधळ झाल्याचे लक्षात आले. शेवटी ५ वाजून १० मिनिटांनी सरांच्या घरी पोचलो. सर्वप्रथम उशीर झाल्याबद्दल सर व मॅडमची माफी मागितली. साधारणतः सर व मॅडम संध्याकाळी ५.३० च्या दरम्यान चक्कर मारायला जातात. त्यामुळे आता सरांची १५-२० मिनिटे तरी मिळतील की नाही अशी भीती मनात वाटली व ती मी सरांना बोलूनही दाखवली. पण सरांनी कधीतरी या माझ्या नियमाला अपवादही असतो असे म्हटल्याने जीवात जीव आल्यासारखे वाटले. सरांकडे त्यावेळी त्यांचे मेक्सिकोचे सहयोगी शास्त्रज्ञ डॉ. राम गोपाल विश्वकर्मा ही आले होते. सरांशी मी प्रथमच ऑफिसच्या कामाव्यतिरिक्त गप्पा मारल्या. सरांनी त्यांचे आवडते विनोदी लेखक, पी.जी. वुडहाउस आणि पु. ल. देशपांडे यांचे काही विनोदी चुटके सांगत वातावरणात मोकळेपणा आणला. प्रिया अर्थात सरांसमोर प्रथमतः थोडीशी गांगरून गेली होती. पण सरांनी तिच्याशी मोकळ्या मनाने गप्पा मारल्याने तिच्या मनावरील ताण कमी झाला. मॅडम फक्त गणितातच नाही तर पाककलेत पण पारंगत आहेत हे त्यांनी केलेल्या चॉकलेट-वॉलनट केकने आणि सरप्राइझ डिशने दाखवून दिले. काही पाककलेचे धडेही त्यांनी शेफालीला दिले. सरांनी आणि मॅडमने बटाटावड्यांचा आस्वाद घेतला आणि चांगले झाले असल्याची पावती दिली. शेफालीला आभाळ ठेंगणे झाल्याचाच भास झाला असेल. त्यावेळी आमचा काढलेला ग्रुप फोटो म्हणजे आयुष्यात काहीतरी आम्ही मिळवले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

त्यांच्या अनेक मराठी, हिंदी, इंग्रजी आणि संस्कृत पुस्तकांची व लेखांची पांडुलिपी तयार करण्याची संधी मला मिळाली हे माझे मोठे भाग्य आहे. काही पुस्तकांमध्ये नारळीकर सरांनी माझे नाव प्रस्तावनेमध्ये नमुद केले आहे. याचा माझे आई वडील, शेफाली आणि प्रिया यांना फार आनंद आहे. माझे वडील तर नेहमीच म्हणतात की माणूस काम कुठेतरी करतोच, पण अशा थोर व्यक्तीबरोबर काम करायला मिळणे याला मोठे नशीब लागते. सरांच्या काही पुस्तकांमध्ये माझे नाव सदैव राहील हीच माझ्या आयुष्यातील एक जमेची बाजू म्हणावी लागेल. एका महान शास्त्रज्ञाबरोबर व त्याचप्रमाणे महान व्यक्तिमत्वाबरोबर मला काम करण्याची संधी मिळत आहे हे माझे फार मोठे भाग्य आहे.

• व्यंकटेश सामक
सेक्शन ऑफिसर,
आयुका, पुणे